महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.

क्र. पोमसं/प्रशि/पोशि भरती/मोप भरती /३६१/२०२२ /3525 मुंबई दिनांक :- /११/२०२२.
22 NOV 2022

# सन २०२१ पोलीस शिपाई भरतीकरीता आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता जाहिर सूचना.

***

सन २०२१ पोलीस शिपाई भरतीमध्ये आवेदन अर्ज सादर करण्याबाबत महाराष्ट्र शासन, गृह विभागाचे बनावट अधिसूचनेद्वारे बनावट संदेश व्हायरल होत आहे. सदर व्हायरल बनावट अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे.

तरी सन २०२१ पोलीस शिपाई भरतीमध्ये आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना कळविण्यात येते की, आवेदन अर्ज सादर करतांना सोबत जोडलेल्या बनावट अधिसूचनेचा विचार करण्यात येवू नये. सन २०२१ पोलीस शिपाई भरतीकरीता शासनाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना / शासन निर्णय / परिपत्रक इ. प्रती policerecruitment2022.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. यापुढे निर्गमित होणाऱ्या सुधारणा याच संकेतस्थळांवर प्रसारीत करण्यात येतील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(संजय कुमार)
पोलीस महासंचालक
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ८५] शुक्रवार, जून २४, २०२२/आषाढ ३, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २३३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्येप्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२०२१ - २०२२ महत्वाचे

अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक - मेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३(भाग-२)/पोल-५अ.—महाराष्ट्र पोलीसअधिनियम (१९५१ चा मुंबई अधि.२२) याच्या कलम ५ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याच्या वतीने त्यास समर कर ् थ णाऱ्या सर्वइतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्येआणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम करीत आहेत :

## महाराष्ट्र पोलीस भरती २०२१-२२

## जाहीर सूचना सूचित

अ ) उमेदवारांनी अर्ज भरतेवेळी फक्त एकाच पदासाठी एकच अर्ज करू शकतात .

क्र १ ) - संपूर्ण महाराष्ट्र जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस शिपाई चालक या पदासाठी एकच अर्ज करावा .

क्र २ ) - संपूर्ण महाराष्ट्र जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस शिपाई या पदासाठी एकच अर्ज करावा .

क्र ३ ) - संपूर्ण महाराष्ट्र जिल्ह्यातील कोणत्याही रा . रा पोलीस शिपाई ' या पदासाठी एकच अर्ज करावा .

क्र ४ ) संपूर्ण महाराष्ट्र जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस शिपाई लोहमार्ग या पदासाठी एकच अर्ज करावा .

सूचित ब ) वरील क्र -१ / क्र -२ / क्र -३ / क्र -४ असे चार अर्ज एक उमेदवार करू शकतो . सूचित क ) वरील क्र -१ एका पेक्षा जास्त अर्ज केल्यास , क्र -२ एका पेक्षा जास्त अर्ज केल्यास क्र ३ एका पेक्षा जास्त अर्ज केल्यास क्र ४ एका पेक्षा जास्त अर्ज केल्यास , भरती प्रक्रियेतून कोणत्या ही क्षणी बाद करण्यात येईल .

https://policerecruitment2022.mahait.org च्या वेबसाईट डेटा बेस वर एका घटकात प्राप्त अर्जांची संख्या जास्त असल्यास व वेबसाईटच्या वेब लिंक मध्ये ( डेटा बेस ) मंधे एका घटकात दोन अर्ज येऊन चुकीची माहिती व सारखी माहिती मिळाल्यास डेटाबेस मधून आपला अर्ज बाद करण्यात येईल. आपल्याला कुठलेही प्रकारचे मैदानी परीक्षेसाठी प्रवेश पत्र उपलब्ध होणार नाही. अशा अर्जांना उमेदवार वैयक्तिक जबाबदार म्हणून कोणतेही सबब ऐकून घेतले जाणार नाही व कोणताही प्रश्न आपल्याला उपस्थित करता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अ. ए. कुलकर्णी,
शासनाचे सह सचिव